सायं.दैनिक
बीड किसान
www.beedkisan.in
• संपादक : शेख कामरान • BEED KISAN

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ३०५ ▪ रविवार, दि. १५ मार्च, २०२६ ▪ पोस्टल दिनांक १६ मार्च, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.

BEED ▪ Year-5 ▪ Issue-305 ▪ Sunday 15 March, 2026 ▪ Postal Date 16 March, 2026 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

## राज्यात उन्हाचा तडाखा वाढला; सोमवारपासून शाळांच्या वेळेत बदल

पुणे (किसान न्युज): राज्यात दिवसेंदिवस उन्हाचा पारा चढत असल्याने शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ही बाब लक्षात घेऊन जिल्हा परिषद प्रशासनाने सोमवारपासून (१६ मार्च) शाळांच्या वेळेत महत्त्वपूर्ण बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. दुसरीकडे, राज्याच्या काही भागांत उष्णतेची लाट असतानाच विदर्भ आणि मराठवाड्यात अवकाळी पावसाचे सावट घोंघावत आहे. शनिवारी राज्याच्या अनेक भागांत उन्हाचा पारा ३८ अंश सेल्सिअसच्या पार पोहोचला होता. दुपारच्या सत्रात वाढणाऱ्या उष्णतेमुळे विशेषतः प्राथमिक शाळेतील चिमुकले विद्यार्थी अस्वस्थ होत आहेत. अनेक ग्रामीण शाळांचे छप्पर लोखंडी पत्र्याचे असल्याने दुपारच्या वेळी वर्गात बसणे असह्य होत होते.

# पिंपळनेर हद्दीत घडलेल्या महिला अत्याचाराचे पडसाद राज्यात उमटणार, आपण किती रानटी बनत चाललोय म्हणत राष्ट्रवादी चे प्रवक्ते लवांडे यांची प्रतिक्रीया!

## महिला अत्याचाराच्या घटना धर्माच्या चष्म्यातून पाहणारे धर्माचे ठेकेदार कुठे बिळात लपून बसले!

पुणे । किसान न्युज

**विवाहितेवर घरातून उचलून बलात्कार करण्याची आणि त्यानंतर तिला तसेच चावडीवर बांधल्याची संतापजनक घटना उजेडात आली आहे. या घटनेचे राज्यभर तीव्र पडसाद उमटत असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने या प्रकरणी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे. राज्यात आज कुठेच महिला व मुली सुरक्षित नाहीत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याची आपली जबाबदारी मान्य आहे की नाही? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस शप या पक्षाने विचारला आहे. तसेच इतर जातीचा आरोपी असला की, मोर्चे काढणारे आपल्या जातीचा आरोपी असला की, मूग गिळून गप्प बसतात. महिला अत्याचाराच्या घटना जातीच्या चष्म्यातून पाहणार का? असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.**

राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी या प्रकरणी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. ते म्हणाले, राज्यात सातत्याने काही ना काही घटना घडत आहेत. बीड जिल्ह्याचा क्राईम रेट कदाचित संपूर्ण देशात सर्वात जास्त आहे. महाराष्ट्राही गुन्हेगारीच्या बाबतीत पहिल्या क्रमांकावर आहे. काल बीड जिल्ह्यातील पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका विवाहित महिलेला घरातून उचलून नेऊन तिच्यावर अत्याचार करण्यात आले. त्यानंतर तिला गावच्या चावडीवर दोरीने बांधून ठेवण्यात आले. हा महाराष्ट्र खरेच शिव, शाहू, फुले, आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र आहे का? की आम्ही रानटी बनलो आहोत. तसेच ते पुढे म्हणाले, आज महाराष्ट्रात मुली व महिला सुरक्षित नाहीत. सरकार एका बाजूला लाडकी बहीण म्हणते



आणि दुसऱ्या बाजूला कोणत्याही महिला व मुली सुरक्षित नाहीत. हजारो महिला व मुली गायब असल्याचे सरकारनेच सांगितले आहे. हिंदुत्ववादी संघटनांचे काही ठेकेदार ज्यांनी धर्माचा ठेका घेतल्यासारखे बोलत असतात. तसेच भाजपचे सरकार पुरस्कृत काही आमदारही हिंदू जनाक्रोश मोर्चा काढतात. हे लोक तेव्हाच मोर्चा काढतात जेव्हा घटनेतील आरोपी बिगर

### मुख्यमंत्री साहेब कायदा सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी मान्य आहे का? राष्ट्रवादीचा सवाल

हिंदू असतो. पण जेव्हा आरोपी आपल्या स्वधर्माचा असतो तेव्हा हे मूग गिळून बसतात. प्रत्येक पोलीस ठाण्याचा क्राईम रेट पाहिला व अत्याचाराच्या घटना पाहिल्या तर हिंदू जनआक्रोश मोर्चा काढणाऱ्या गोपीचंद पडळकर असतील, संग्राम जगताप, नीतेश राणे व महेश लांडगे असतील या ४ आमदारांना भाजपने सोडले आहेत. संभाजी भिडे यांचे धारकरी व बजरंग दलाचे कार्यकर्ते असतील हे सर्व धर्मांध लोक आरोपी बिगरहिंदू असतो तेव्हा चवताळून उठतात. सोशल मीडियावर पोस्ट टाकतात. पण आता बीडच्या या महिलेला न्याय मिळेल का? चित्रा वाघ असतील किंवा » पान २ वर



# खरंच गॅस टंचाई की कृत्रिम खेळ?

## सिलिंडरसाठी नागरिकांच्या रांगा, प्रशासनाचे दावे फोल

बीड । किसान न्युज

**गॅस तुटवडा हा सध्या कळीचा मुद्दा असून, शासन आणि प्रशासन पुरेसा गॅस असल्याचे दावा करीत आहे. मात्र प्रत्यक्षात रांगा लागल्या दिसत असल्याने हा दावा फोल ठरताना दिसत आहे. शासन, प्रशासन अफवांवर विश्वास ठेवू नका असे आवाहन करीत आहेत पण रांगा हाटत नसल्याने खरंच गॅस टंचाई आहे की, कृत्रिम खेळ असा संशय निर्माण होत आहे.**



अमेरिका-इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशात इंधनाच्या पुरवठ्याबाबत चर्चा सुरू असताना बीड शहरात मात्र घरगुती गॅस सिलिंडरचा कृत्रिम तुटवडा निर्माण झाल्याची तीव्र भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. प्रशासनाकडून गॅसचा पुरेसा साठा आहे असे सांगितले जात असताना प्रत्यक्षात मात्र प्रत्येक गॅस एजन्सी समोर ग्राहकांच्या रांगा दिसत आहेत. गॅस उपलब्ध आहे तर मग या रांगा हाटत का नाहीत? गॅस एजन्सींनी अचानक घरपोच डिलिव्हरी बंद का केल्या? काही महिन्यांपूर्वीपर्यंत गल्लोगल्ली फिरणाऱ्या गॅसच्या गाड्या अचानक गायब झाल्या आहेत. त्यामुळे बुकिंग केलेल्या ग्राहकांना स्वतः रस्त्यावर जाऊन रांगा लावून सिलिंडर घ्यावे लागत आहेत. यामध्ये आणखी एक गंभीर शंका नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. बुकिंग करणाऱ्या सामान्य ग्राहकांच्या टाक्या हॉटेल चालकांकडे किंवा व्यावसायिकांकडे वळवल्या जात नाहीत याची खात्री कोण देणार? कारण अनेक ठिकाणी बुकिंग नसताना देखील जादा दोनशे-तीनशे रुपये घेऊन सिलिंडर देण्याचे प्रकार पूर्वी खुलेआम सुरू होते. आज अचानक ते सर्व व्यवहार कुठे गायब झाले, हा देखील मोठा प्रश्न आहे. प्रशासन » पान २ वर


# महिला तलाठ्याला लुटले

## केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

केज । किसान न्युज

रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांची रामकथा श्रवण करून घरी परत येणाऱ्या तलाठी महिलेच्या गळ्यातील मिनी गंठण चोरट्यांनी लांबविलेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. श्रीकृष्ण आश्रमात, श्रीकृष्ण मंदिर भूमिपूजन व महाविष्णू यज्ञ निमित्त १०८ महाचंडी यज्ञ आयोजित केला आहे. त्या निमित्त ह.भ.प. रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांची संगीत रामकथा आयोजित केली आहे. या कार्यक्रमाला अनेक ठिकाणाहून भक्तांनी मोठ्या प्रमाणात गर्दी झालेली आहे. महिला तलाठी आशा विजयसिंह काकडे वय वय, ( वय ३६ वर्ष) या रामराव महाराज ढोक यांची कथा ऐकून सायंकाळी ५:३० वा. च्या सुमारास घरी परत जात असताना त्यांच्या गळ्यातील दीड तोळे वजनाचे मिनी गंठण अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याचे निदर्शनास आले. शनिवारी (दि.१४) त्या मिनी गंठणची किंमत सुमारे पावणे तीन लाख रु. च्या आसपास आहे. याप्रकरणी तलाठी आशा काकडे यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गु. र. नं. १२९/२०२६ नुसार अज्ञात व्यक्ती विरुद्ध ३०३ (२) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रल्हाद चव्हाण हे तपास करीत आहेत.







बीड : पोलीस भरती २०२४-२५ साठी शारीरिक चाचणीत पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांची लेखी परीक्षा आज आदित्य महाविद्यालय तेलगाव नाका येथे घेण्यात येणार असून त्या निमित्ताने कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# एपीआय इंगळेंचा दोन नंबरवाल्याना दणका; ३७ लाखांचा मुद्देमाल जप्त; अनेकजण ताब्यात



## विविध ठिकाणी धडक कारवाई सुरू केल्याने अवैध चालकांना पळता भुई थोडी

बीड । किसान न्युज

गेवराई तालुक्यातील चकलांबा पोलीस ठाण्याचा पदभार घेताच एपीआय सचिन इंगळे यांनी ठाणे परिसरात धडाकेबाज कारवायांना सुरुवात केली असून, यामध्ये त्यांनी अवैध जुगार अड्डे, अवैध वाळू वाहतूक, अवैध दारु विक्री आदी कारवाया एकदाच केल्याने दोन नंबरवाल्याना चांगलाच दणका दिला आहे. या एकाच वेळी धडाकेबाज कारवाया केल्याने अवैध धंदे चालकांना पळता भुई थोडी झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. तसेच या विविध छाप्यात ३७ लाखांचा मुद्देमाल जप्त करून अनेकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. शनिवारी दि. १४ पोलीस ठाणे हद्दीतील जुगार अड्ड्यावरील छाप्यात दुचाकी, मोबाईल आणि रोख रक्कम असा एकूण १ लाख ७ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी अमजद फरीद पठाण रा. रुबाबदार, ता. गेवराई, दिलीप विष्णू दौंड रा. चकलांबा,पोपट विठ्ठलराव खेडकर रा. चकलांबा, दिनकर मुरलीधर तांगडे रा. चकलांबा आणि एका अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच भाट अंतरवली येथे अवैध दारू » पान २ वर

रमजान मुबारक 25
आज का इफतार
06.40
कल की सहर
05.13

स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058
सोने २४ कॅरेट
158,000
२२ कॅरेट
152,000
चांदी प्रतिकिलो
265,000




## रसवंतीचे इंजिन चोरताना ग्रामस्थांनी चोरटा पकडला

### उंदडवडगाव येथील घटना

नेकनूर । किसान न्युज

बीड तालुक्यातील नेकनूर पोलीस ठाणे हद्दीतील उदंड वडगाव येथे रसवंतीचे इंजिन चोरताना चोरट्याला रंगेहात पकडल्याची घटना रात्री घडली. यानंतर गावकऱ्यांनी पोलिसांना पाचारण केले; मात्र घटनास्थळी आल्यानंतर पोलिसांनी ग्रामस्थांनाच दमदाटी केल्याने पोलीस अन् ग्रामस्थांमध्ये शाब्दिक चकमक झाली. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने उदंड वडगाव येथे रसवंत्या सुरू झाल्या आहेत. या रसवंत्या चालविण्यासाठी इंजिनचा वापर केला जात आहे. मात्र रात्री रसवंत्या बंद झाल्या की, यांचे इंजिन चोरीच्या घटना घडत होत्या, यामुळे रसवंती चालक परेशान होते. अखेर हा इंजन चोरणारा चोरटा ग्रामस्थांनी पकडला आहे. त्यास पकडताच नेकनूर पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस पोहोचले पण त्यांनी ग्रामस्थांनाच दमदाटी केली असा आरोप करण्यात येत आहे. यामुळे पोलीस अन् ग्रामस्थांमध्ये शाब्दिक चकमक झाल्याचे सांगितले जात आहे. चोरट्याला ताब्यात घेऊन गेले आहेत. यामुळे येथील चोरीच्या घटना उघडकीस येणार असल्याची आशा व्यक्त केली जात आहे.